# तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय, पुणे.
## ४१२ ई शिवाजीनगर, पुणे ४११ ०१६.
**दुरध्वनी क्रमांक. ०२० २५६५६२३४, ईमेल** ropune@dtemaharashtra.gov.in

जा.क्र.तंशि/विकापु/लेखा १/२०१९/3559 दिनांक - 19 AUG 2019

अत्यंत महत्वाचे व कालमर्यादित.

प्रति,

प्राचार्य,

शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालये/औषधनिर्माणशास्त्र महाविद्यालये

शासकीय तंत्र निकेतने, पुणे विभाग, पुणे.

विषय - सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाज (अनिवार्य खर्च) प्रस्ताव पाठविणेबाबत.

(मुख्य लेखाशिर्ष २२०३ तंत्र शिक्षण, मागणी क्रं. डब्ल्यू -३) (अनिवार्य खर्च)

संदर्भ - ०१.तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/अर्थ.अंदाज/२०१९-२०/५८ दिनांक ०८/०८/२०१९

०२. तंत्र शिक्षण संचालनालय,मुंबई येथील कार्यासन क्रं.१५ येथील दिनांक ०९/०८/२०१९ चा दूरध्वनी संदेश.

०३.या कार्यालयाचे पत्र क्रं. तंशि/विकापु/लेखा १/२०१९/३३१५ दिनांक ०९/०८/२०१९

०४. तंत्रशिक्षण संचालनालयाचे पत्र क्र. १५/अर्थसं/अ.अं.व सु.अं/२०१९-२०/६३ दिनांक २०/०८/२०१९

उपरोक्त विषयाबाबत संदर्भिय पत्रांचे अवलोकन करावे. त्यानुसार सर्व संस्थाप्रमुखांना कळविण्यात येते की, सन २०२०-२१ चे अर्थसंकल्पीय अंदाज आणि सन २०१९-२० सुधारीत अंदाजपत्रक तयार करतांना **संचालनालयाचे संदर्भिय पत्रातील १ ते १० सूचनाचे व विभीय कार्यालयाने दिलेल्या पत्रातील सूचनांचे पालन करुनच अंदाजपत्रक तयार करण्यात यावे. याशिवाय** संदर्भ कमांक ०४ नुसार संचालनालयाने आयोजित केलेल्या कार्यशाळेत दिलेल्या सूचना आपणास खालील प्रमाणे कळविण्यात येत आहे.

अंदाजपत्रक मागणी करतांना हजारात करण्यात यावी.

कोणत्याही अनुदानाची मागणी करतांना त्याचे नियोजन करूनच वाजवी मागणी करण्यात यावी. उदा. विजदेयके, दूरध्वनी देयके, पाणीपटटी व इतर यात मागील झालेला खर्च व पुढे किती आवश्यक याबाबत पडताळणी करूनच मागणी असावी.

कंत्राटीसेवा बाबत टेंडर प्रक्रिया राबून येणारा खर्च याची मागणी करावी.

प्रपत्र १ व १ अ मध्ये मागील ३ वर्षाचा खर्चाच्या रकमा हया प्रत्यक्षात झालेल्या खर्चाच्या रकमाशी जुळणे आवश्यक आहे.

प्रपत्र २ मध्ये प्रत्यक्ष ४ महिन्याचा खर्च वेतन यामध्ये वैद्यकीय प्रतिपूर्ती,स्वग्राम प्रवास सवलत, फरकाची देयक इ.बाबीचा समावेश करण्यात यावा. तसेच ८ महिन्याच्या खर्चाची मागणी व्यवस्थीत करण्यात यावी. शिक्षकीय पदांना ७ वा वेतन आयोग अद्याप लागू झालेला नसल्याने पहिल्या ४ महिन्यातील ६ वा वेतन आयोग व ७ वा वेतन आयोग या मधील फरकाची रक्कम ८ महिन्यात इतर खर्चामध्ये समाविष्ठ करण्यात यावी.

शिक्षकीय पदाच्या वेतननिश्चती व वेतनश्रेणीसाठी दिनांक ०१/०३/२०१९ राजपत्र पहावे.

प्रपत्र ४ यामधील मंजुर पदे भरलेली पदे व रिक्त पदे ही सुध्दा शासन निर्णयानुसार असावी.

या शिवाय इतर सर्व विवरणपत्रे संपूर्ण व अचुक भरावीत.

कमी अधिक खर्चाबाबत व्यवस्थीत स्पष्टीकरण सोबत जोडणे बंधनकारक आहे. त्याशिवाय अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक स्विकारले जाणार नाहीत याची संस्था प्रमुखांनी खबरदारी घ्यावी.

तसेच अंदाजपत्रक तयार करतांना पदांच्या आढाव्यानुसार व त्यानंतरच्या शासन निर्णयान्वये वेळोवेळी मंजूर झालेल्या पदांप्रमाणे स्थायी/अस्थायी तसेच वर्ग निहाय पदे जुळवून, शासनाने मंजूर केलेल्या पदांचे व शासनामार्फत नियुक्त केलेल्या पदांचे, अर्थसंकल्पीय अंदाजामध्ये अंर्तभूत करुन पद निर्मितीचे शासन निर्णयाच्या प्रतीसह, विहीत प्रपत्रात योजनानिहाय सीआरसी व्हाईस अर्थसंकल्पीय अंदाज तयार करावे. तयार झालेले अंदाजपत्रक **सर्व संस्थाप्रमुखांनी स्वत: तपासणी करून बरोबर असल्याची खात्री करूनच ज्या कर्मचा-यांनी अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक तयार केलेले आहे त्यांनीच मा. संचालक, तंत्र शिक्षण संचालनालय, मुंबई येथे सादर करण्यापूर्वी या विभागीय कार्यालयास सादर करावे. विभागीय कार्यालयाने तपासणी केल्यानंतर संचालनालयाने ठरवून दिलेल्या वेळापत्रकानुसार संचालनालयास सादर करण्यात यावे.**

**विभागीय कार्यालयास अर्थसंकल्पीय अंदाजपत्रक सादर करावयास येणे पूर्वी या कार्यालयातील सहाय्यक संचालक (अतांत्रिक) यांना दूरध्वनी करून येणे.**

प्र.सहसंचालक,
तंत्र शिक्षण विभागीय कार्यालय,पुणे